# MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI

## Agricultural Research Station, Chas

1. **Name & complete address of the Research Scheme/ Centre** - Agricultural Research Station, Chas. Tal & Dist- Ahilyanagar. Pin- 414 005
2. **Year of establishment** – 1941
3. **Major objectives/ Mandate for establishment of - A) Crop husbandry - Non plan (106)**
   **Research Scheme/ Centre -** Under the National Agricultural Research Project, this center has allotted the testing of crop production technology and it is expected to conduct the research on the following aspects.
   - Verification and Testing of Crop Production Technology.
   - Screening of suitable crop varieties of sorghum, safflower, Bajra, horse gram, moth bean, Sunflower, Tur etc.
   - Testing of technology developed for controlling soil erosion and water recycling.
   - Cropping / Farming system research.

4. **Historical background -**

Agriculture Research Station, Chas was established in the year 1941 as one of the dry farming testing sub-center of the main Dry Farming Research Station, Solapur. The total area of the research station is 28.03 ha.Out of which 23.78 ha area is under cultivation and remaining is under building, bunds, roads, nala, well, farmpond and percolation tank etc. The soils of the research station are shallow to deep and clay loam in texture.Out of total 28.03 ha area, the shallow soils are 17.8 percent, and medium deep soils are 48.9 percent and a deep soil occupies 33.3 percent. Geographically, it is situated at $19^0$ 59'N latitude and $75^0$ 41' E longitudes.Its elevation is 543 m from mean sea level (MSL). Agriculture Research Station falls under the rainfall zone II E4 ($C_2D_2$) $D^1E^3$ of the Scarcity Zone of Maharashtra State. The average maximum and minimum temperatures are 37.6 0c and 15.3 0c respectively.The average rainfall at the research station is 584.5 mm. The Research station is situated in drought prone area and comes under the semiarid tropics.The rainfall in this area is low, uncertain, erratic and ill distributed. The Agricultural Research Station, Chas is situated 13 Km away from the Ahmednagar city on Ahmednagar – Pune highway road. The most important technologies developed/recommended by the Agricultural Research Station,Chas especially intercropping systm, crop rotation, soil conservation fertilizer management similarly, participation of different crop improvement programme. The Agricultural Research Station, Chas also implementing the various *kharif* and *Rabi* seed production programme crops viz; Soybean Tur, Sorghum, Gram, Safflower, Aster, Onion etc.on the basis of large scale.The different crops seeds are also sale to the farmers. The various crops implementing MLT programme in the *kharif* and *Rabi* season. This research station has been completed 84 years yet and main object is to developed dryland technologies, extension programme, crop demonstratin and farmers ralley etc. Since last few years, the research station is also conducting the need based cropping system trials independently.The Agricultural Research Station, Chas has been adopted all new technologies for Dry land Agriculture from time to time and implementing for seed production programme carried out by ARS, Chas.This useful technologies/materials adopted by local farmers.

**5. Total Area of the farm and other facilities**

**A) The distribution of area is as under:**

1. Total area of the farm : 28.03 ha
2. Net Cultivable are : 23.78 ha

2A.Rainfed : 17.78 ha

2B. Irrigated : 6.0 ha

3. Other : 4.25 ha

**B) Available facilities**

**I) Field**

1. Farm pond - 0.12 ha
2. Well – 01
3. Elect. Motor (7.5hp) -1
4. pipeline 4 inch
5. Threshing yard

**II) Office facilities**

1. Office building (old) -1
2. Office building (New) -1
3. Office Incharge resident - 1
4. Computer set - 1

**6. Details of the sanctioned posts -**

| Sr. No. | Designation | Sanction post | Post Filled | Post vacant |
|---|---|---|---|---|
| 1. | Officer Incharge | 1 | - | 1 |
| 2. | Jr. Research Asstt. | 1 | 1 | - |
| 3 | Agril. Asstt. | 2 | 1 ( Pulled to CS MPKV Rahuri) | 1 |
| 4. | Grade – I- Mazdoor | 7 | 4 | 3 |
| 5. | Watchman | 1 | - | 1 |
| | **Total** | **12** | **06** | **06** |

**7. Significant/ innovative activities and programmes implemented by Research Scheme/Centre**

**Research scheme**

1. Crop contingent planning research trial under scarcity zone of Maharashtra
2. Performance of intercropping system research trial under rainfed conditions.
3. MLT programme of Kharif soybean, Tur, Mothbean, Horsegram, Sunflower, Bajra etc. crop study under rainfed conditions.
4. MLT programme of MLT programme of Rabi sorghum, Gram, safflower etc crop study under rainfed conditions.

**Kharif and Rabi seed production**

I) To implement the kharif seed production of Soybean, Tur, Udid etc crop.

II) To implement the Rabi seed production of Sorghum, Gram, Safflroweretc. crop.

**III) Commercial seed production**

1. To prepare onion nursery and implement Onion seed production.
2. Taking Aster seed production.

5. Drone pilot practical training at ARS, Chas

6. Selling of Agri. Inputs like seeds of different crop, Agri. Implements, Bio fertilizers, pesticides, publications etc. from sale counter to farmers and giving guidelines at ARS, Chas under MPKV. Rahuri.

**8. Major improved/ hybrid varieties, agriculture technologies developed at Research Scheme/Centre**

1. Contribution to implement MLT programme of Kharif soybean, Tur, Mothbean, Horsegram, Sunflower, Bajra etc. crop study and MLT programme of Rabi sorghum, Gram, safflower etc crop study under rainfed conditions.
2. To study the Crop contingent planning and intercropping system research trial under rainfed Conditions.

**Crop improvement programme**

1. Kidney bean variety MBS-27 gave highest grain yield.
2. Sunflower variety SS-56 and Bhanu found to be beneficial for drought prone area.
3. Sorghum varieties M 35-1 Phule Chitra & Phule Vasudha were found to be best for *Rabi* cultivation and Sorghum variety selection – 3 and P. Anuradha is found to be better for shallow soils in rainfed condition.
4. Horse gram cultivars Sina and Man and P. Sakas were tested and found better for cultivation.
5. Safflower varieties Bhima and Kusuma were also found better in rainfed condition.

**Agri. Technology**

**A) Double Cropping**

1. With availability of short duration varieties, it is possible to grow two crops in a year. Green Gram / Black gram followed by *Rabi* sorghum as double cropping gave highest monetary returns and proved better.
2. Growing of *Kharif* pearl millet followed by *Rabi* chickpea as a double cropping also gave better results and fetched higher monetary returns.

**B. Inter Cropping**

1. Inter cropping of pearl millet + red gram (2:1) fetched maximum total momentary returns than sole crop of pearl millet or red gram with minimum risk.
2. Inter cropping of Sunflower + red gram (2:1) fetched maximum total monetary returns and proved better system.
3. Growing of five rows of groundnut (JL-24) and two rows of sunflower (45X15cm) gave maximum monetary returns as compared to sole cropping.

**C. Crop Rotation**

Gram and Groundnut rotated with *Rabi* sorghum have higher output. Simillarly, Pearl millet +red gram (2:1) rotated with cowpea and also chickpea have higher yield.

**D. Crop Management**

Sowing of sole crop of safflower in *Rabi* fetched highest monetary returns than sowing of *Rabi* sorghum + safflower as inter cropping.

**E. Fertilizer use**

Application of 50 kg N and 25 kgP2O5 per hectare to *Rabi* sorghum have highest grain and fodder yields in medium deep and deep soils.

**9. Major agriculture technological recommendations released byResearch Scheme/Centre**

**Recommendation**

1. The cropping sequences viz., Chrysanthemum (April Planted) - Onion (*Rabi)* or Marigold *(Kharif)* – Onion **(**Rabi**)** are recommended under irrigated conditions for obtaining higher net monetary returns and B: C ratio.(2000)
2. The Bajra + Cowpea (2:1) or Bajra + Soybean (2:1) intercropping system for light soils under the scarcity zone of western Maharashtra is recommended for getting higher yield and monetary returns. (2023-24)

**10. Future road map of the research**

1. Cultivation of commercial crops e.g. dryland fruit tree crop under rainfed condition.
2. To develop technology and crop method for controlling crop loss regarding minimum risk among the study of cimate change with effect on crop under agri.climate zone.
3. To develop high yielding varieties and resistant to biotic and abiotic stress creating short or long duration climate change.
4. To implement agri machanisation crop method.
5. To implement crop method/ technology favourable to dryland condition.
6. To implement the agro based industy and professional system.
7. To create infrastructure facilities and strengthening of research centre.
8. To increase the onion seed production and sale to farmers by taking extra effoerts for self supporting of research centre.

**11. Measures required for improvement / stengthening of the Research Scheme/Centre**

1. To increase the onion seed production and sale to farmers by taking extra effoerts for self supporting of research centre.
2. To create infrastructure facilities and strengthening of research centre.

The details are as follows

1. Rat proof godown/ store room 2. Agri.sale counter. 3. Farmshed for vehicles.
4. Lavatory room 5. New office building 6. Repairing of building road elec.street light
7. To implement agri machanisation crop method.
8. To implement crop method/ technology favourable to dryland condition.
9. To implement the agro based industy and professional system.

**12. Beneficiary to farmers**

The Agricultural Research Station, Chas is situated 13 Km away from the Ahmednagar city on Ahmednagar – Pune highway road. The most important technologies developed/recommended by the Agricultural Research Station,Chas especially intercropping systm, crop rotation, soil conservation fertilizer management similarly, participation of different crop improvement programme. Agriculture Research Station, Chas was established in the year 1941 as one of the dry farming testing sub-center of the main Dry Farming Research Station, Solapur. The average rainfall at the research station is 584.5 mm.The averages maximum and minimum temperatures are 37.6 0c and 15.3 0c respectively. The Agricultural Research Station, Chas also implementing the various *kharif* and *Rabi* seed production programme crops viz; Soybean Tur, Sorghum, Gram, Safflower, Aster, Onion etc.on the basis of large scale.The different crops seeds are also sale to the farmers. The various crops implementing MLT programme in the *kharif* and *Rabi* season. This research station has been completed 84 years yet and main object is to developed dryland technologies, extension programme, crop demonstratin and farmers ralley etc. Since last few years, the research station is also conducting the need based cropping system trials independently.The Agricultural Research Station, Chas has been adopted all new technologies for Dry land Agriculture from time to time and implementing for seed production programme carried out by ARS, Chas.This useful technologies/materials adopted by local farmers.Due to this research methods and adopting new technologies which are helpful for increasing economic level and standard of living of farmers.

**13. Photograhs of historical and innovative activities of the Research Scheme/Centre**




## Agriculture Research Station, Chas



## Demonstration of new Rain Pipe irrigation System at ARS, Chas



Demonstration Of insitu Moisture Conservation Technique at ARS, Chas



Farmers visit at ARS, Chas from different village viz; malvadi, Padvi. Deulgaon Gada, Varkhed. Tal. Daund. Dist.Pune. on 19/10/2014




Field visit of Dr. Gadakh sir DOR, MPKV, Rahuri



Field visit of Dr. Dodke sir Dr. Gagre sir at ARS, Chas
for inspection of Gram seed plot.(21/02/2025)



Tree plantation at ARS, Chas




**The Bajra + Cowpea (2:1) or Bajra + Soybean (2:1) intercropping system for light soils under the scarcity zone of western Maharashtra is recommended for getting higher yield and monetaryreturns. (2023-24)**



General view of Onion Seed plot at ARS, Chas




Seed Sale of Onion at ARS, Chas




Seed sale counter at ARS, Chas

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि संशोधन केंद्र, चास

१. **संशोधन केंद्राचे नाव व पूर्ण पत्ता** - कृषि संशोधन केंद्र, चास ता.जि. अहिल्यानगर

२.- **स्थापना वर्ष** - सन १९४१

३. **संशोधन योजना /केंद्र स्थापनेबाबतचा प्रमुख उद्देश** - अ) पीकसंवर्धन- योजनेत्तर योजना (१०६).

**ब) स्थापनेची उदिदष्टे -**

१. कोरडवाहू शेती पिक उत्पादन तंत्रज्ञान पडताळणी आणि चाचणी करणे.

२. कोरडवाहू क्षेत्रास अनुकूल ज्वारी, बाजरी, करडई, हरभरा ,ॲस्टर, हरभरा, सूर्यफूल,मटकी, कुलथी इ. पीकांच्या वाणांची निवड करणे

३. मृदा / जमीनीची झीज नियंत्रित करणे आणि पाणी पुर्नवापर याकरिता तंत्रज्ञान चाचणी विकसित करणे.

४. पीक पध्दती / प्रक्षेत्र प्रणाली संशोधन राबविणे.

**४. ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

कृषि संशोधन केंद्र, चास ता.जि. अहिल्यानगर या केंद्राची स्थापना ८ जुलै १९४१ मध्ये झाली असून हे केंद्र मुख्य कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, सोलापूर या केंद्राचे उपकेंद्र म्हणून कार्यान्वित आहे. या केंद्राचे एकुण क्षेत्र २८.०३ हेक्टर असून एकुण क्षेत्रापैकी २३.७८ हेक्टर लागवडीखालील असून उर्वरीत क्षेत्र हे इमारत, रस्ते, शेततळे, विहीर,इ. खाली आहे. या केंद्रामध्ये एकुण २८.०३ हेक्टर क्षेत्रापैकी १७.०८ टक्के हलकी, ४८.०९ टक्के मध्यम व ३३.३ टक्के भारी स्वरूपाची जमीन आहे. या संशोधन केंद्राचे सरासरी कमाल तापमान ३७.६ से. व किमान तापमान १५.३ से. इतके असून सरासरी पर्जन्यमान ५८४.५ मी.मी. इतके आहे. सदरचे संशोधन केंद्र हे अहिल्यानगर शहरापासून १३ कि. मी. अंतरावर अहिल्यानगर- पुणे या राज्यमार्गावर आहे. या संशोधन केंद्राची स्थापना झालेपासून आजतगायत या केंद्रामार्फत कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाच्या विविध शिफारशीमध्ये प्रामुख्याने आंतरपीक पध्दत, पीकफेरपालट, मृद व जलसंधारण, खते व्यवस्थापन तसेच विविध पीक वाणांच्या निर्मितीमध्ये सहभाग आहे. तसेच या केंद्रावर सोयाबीन, कांदा, बाजरी, सूर्यफूल, तूर, ज्वारी, करडई, ॲस्टर, हरभरा इ. विविध पीकाचा बिजोत्पादन कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविण्यात येत असून विविध बि-बियाणांची शासकिय माफक दरात शेतकऱ्यांना विक्रीही केली जाते. यास्तव विविध खरीप व रब्बी पीकांच्या संशोधनात्मक बहूक्षेत्रीय चाचण्या घेण्यात येतात. या संशोधन केंद्रास ८४ वर्षे पूर्ण झाली असून या केंद्राचा मुख्य उददेश कोरडवाहू शेतीचे तंत्रज्ञान विकसीत करणे, तसेच कोरडवाहू शेतीविषयक विस्तार कार्यक्रम राबविणे. यामध्ये पीक प्रात्यक्षिक शेतकरी मेळावे इ. क़ृषि विषयक सुधारीत तंत्रज्ञानाचा प्रसार करणे असा आहे.

**५. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा -**

**अ.** एकुण क्षेत्र. - २८.०३ हे.

१. निव्वळ लागवडीखालील क्षेत्र - २३.७८ हे.

२ अ. कोरडवाहू - १७.७८ हे.

२ ब. बागायती - ०६.०० हे.

३. इतर - ०४.२५ हे.

**ब. उपलब्ध सुविधा - अ. प्रक्षेत्र**

१. शेततळे - ०.१२ हे.

२. विहीर - ०१

३. ७.५ अश्वशक्ती इलेक्ट्रीक मोटार

४. ४ इंच पाईपलाईन

५- मळणी खळे (Threshing yard)

**ब. कार्यालयीन सुविधा**

१. कार्यालयीन इमारत जूनी - १

२. कार्यालयीन इमारत नवीन - १

३. प्र. अ. निवासस्थान - १

४. संगणक संच - ०१

**६. मंजुर पदांचा तपशिल (प्रकल्प निहाय मंजूर,सद्या भरलेली व रिक्त पदे) -**

| **अ. क्र.** | **पदाचा तपशिल** | **मंजूर पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभारी अधिकारी (सहाय्यक प्राध्यापक) | १ | ० | १ (०१/०८/२०२४ पासून रिक्त) |
| २ | कनिष्ठ संशोधन सहाय्यक | १ | १ | - |
| ३ | कृषि सहाय्यक | २ | १ | १ ( सेवासंचित ) बियाणे विभाग, राहुरी. |
| ४ | पहारेकरी | १ | ० | १ |
| ५ | मजूर | ७ | ४ | ३ |
| | एकुण | **१२** | **६** | **६** |

**७. संशोधन योजना /केंद्रामार्फत राबविण्यात आलेले वैशिष्टयेपूर्ण उपक्रम -**

**संशोधन योजना**

१. कोरडवाहू पीक आधारित आपत्कालीन पीक योजना संशोधन चाचणी अभ्यास.

२. कोरडवाहू पीकनिहाय आंतरपीक पध्दत संशोधन चाचणी अभ्यास.

३. कोरडवाहू पीक आधारित खरीप सोयाबिन, तूर, मटकी, कुलथी, सूर्यफूल, बाजरी, इ. पीकांचा बहुक्षेत्रीय चाचणी अभ्यास.

४. कोरडवाहू पीक आधारित रब्बी ज्वारी, हरभरा, करडई इ. पीकांचा बहुक्षेत्रीय चाचणी अभ्यास.

**खरीप व रब्बी बिजोत्पादन**

**अ.** सोयाबिन, तूर, उडिद इ. खरीप पिकांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे.

**ब**. ज्वारी, हरभरा, करडई इ. रब्बी पिकांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे.

**क. व्यापारी बिजोत्पादन**

१. कांदा पिक रोपवाटिका तयार करणे व बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे.

२. ॲस्टर पिक बिजोत्पादन घेणे.

५. कृषि संशोधन केंद्र येथे ड्रोन पायलट प्रात्यक्षिक प्रशिक्षण.

६. महात्मा फुले क़षि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, चास सन २०१९ मध्ये कृषि विक्री केंद्र स्थापन होऊन त्यामार्फत बि-बियाणे, क़षि अवजारे, क़षि जैविक खते, प्रकाशने, किटकनाशक इ. क़षि साहित्यांची शेतकऱ्यांना विक्री करणे व मार्गदर्शन करणे.

**८.संशोधन योजना/केंद्रामार्फत विकसित/ प्रसारित करण्यात आलेले वैशिष्टयेपूर्ण सुधारित /संकरीत वाण, क़षि तंत्रज्ञान**

१. कोरडवाहू पीक आधारित खरीप सोयाबिन, तूर, मटकी, कुलथी, सूर्यफूल, बाजरी, इ. पीकांचा बहुक्षेत्रीय चाचणी अभ्यास तसेच रब्बी ज्वारी, हरभरा, करडई इ. पीकांचा बहुक्षेत्रीय चाचणी कार्यक्रम राबविण्यात सहभाग.

२. कोरडवाहू पीक आधारित आपत्कालीन पीक योजना तसेच पीकनिहाय आंतरपीक पध्दत संशोधन चाचणी अभ्यास.

**संशोधन उपलब्धी**

**पीक सुधारणा कार्यक्रम**

१. कोरडवाहू क्षेत्रासाठी मटकी (एम बी एस २७) या वाणाचे अधिक धान्य उत्पादन.

२. सूर्यफूल (एस एस ५६) व भानू हे वाण कोरडवाहू क्षेत्रासाठी उपयुक्त.

३. ज्वारी वाण एम-३५-१, फुले चित्रा व फुले वसुधा रब्बी हंगामाकरिता आणि सिलेक्शन -३ व फुले अनुराधा हे वाण हलक्या जमिनीसाठी उपयुक्त.

४. कुलथी वाण सीना, मान व फुले सकस हे वाण लागवडीसाठी उत्तम.

६. करडई वाण भीमा, कुसूमा हे सुध्दा कोरडवाहू क्षेत्रासाठी उत्तम.

**क़षि तंत्रज्ञान -**

**अ. दुबार पीक पध्दती -**

१. खरीप मूग/ उडीद त्यानंतर रब्बी ज्वारी या दुबार पीक पध्दतीत १ वर्षात कमी कालावधीचे पीक वाण घेऊन अधिक उत्पादन मिळाल्याचे सिध्द झाले आहे.

२. खरीप बाजरा त्यानंतर रब्बी हरभरा या दुबार पीक पध्दतीत सुध्दा अधिक उत्पादन मिळाले असून जास्त परिणामकारक ठरले आहे

**ब .आंतर पीक पध्दती -**

**१.** बाजरा + तूर (२ : १) या आंतर पीक पध्दतीत कमीत कमी जोखीम घेह्न एकक बाजरा पीकापेक्षा जास्तीत जास्त आर्थिक उत्पादन मिळाले आहे.

२. सूर्यफूल+तूर(२ : १) या आंतर पीक पध्दतीत कमीत कमी जोखीम घेह्न एकक सूर्यफूल पीकापेक्षा जास्तीत जास्त आर्थिक उत्पादन मिळाले आहे.

३..भूईभूग +सूर्यफूल(५ : २) या आंतर पीक पध्दतीत कमीत कमी जोखीम घेह्न एकक भूईभूग पीकापेक्षा जास्तीत जास्त आर्थिक उत्पादन मिळाले आहे.

**क. पीक फेरपालट -**

१. हरभरा आणि भूईमूग पीक फेरपालट करून त्यानंतर रब्बी ज्वारी घेणे अधिक फायदेशीर तसेच बाजरा + तूर (२ : १) त्याचबरोबर चवळी आणि हरभरा या पीकाची सूध्दा फेरपालट करून जास्त उत्पादन मिळाले आहे.

**ड. पीक व्यवस्थापन -**

१. एकक करडई या रब्बी पीकाची पेरणी रब्बी ज्वारी +करडई या आंतरपीक पध्दतीपेक्षा जास्त फायदेशीर ठरली आहे.

**इ. रासायनिक खत मात्रा उपयोग -**

मध्यम व मध्यम खोल जमिनीत प्रति हेक्टरी ५० कि. नत्र व २५कि. स्फुरद याचा वापर करून रब्बी ज्वारीचे अधिक धान्य व चारा उत्पादन मिळाले आहे.

**८. संशोधन केंद्रामार्फत प्रसारित करण्यात आलेले वैशिष्टयेपूर्ण क़षि संशोधन शिफारशी -**

**शिफारस**

१. पीक क्रमवारीत एप्रिलमध्ये शेवंती पिकाची लागवड करून रब्बी कांदा किंवा खरीप झेंडू लागवड व तदनंतर पुन्हा रब्बी कांदयाची बागायती क्षेत्राकरीता निव्वळ पीक उत्पादन व लाभ /किमंत गुणोत्तर मिळविण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे (२०००)

२. पश्चिम महाराष्ट्र ातील अवर्षण प्रवण विभागातील हलक्या जमिनीसाठी बाजरा + चवळी (२: १) किंवा बाजरा + सोयाबीन (२: १) या आंतरपीक पध्दतीची अधिक उत्पादन व आर्थिक फायदयासाठी शिफारस करण्यात येत आहे (२०२३-२४)

**९. पुढील संशोधनाची दिशा -**

अ. कोरडवाहू क्षेत्र आधारित व्यापारी पिकांची लागवड करणे उदा. कोरडवाहू फळझाडे.

ब. क़षि हवामान विभागात हवामानात होणारे बदल त्यांचे पीकांवर होणारे परिणाम यांचा अभ्यास करून पीक नूकसानीची जोखीम कमी करण्याविषयी तंत्रज्ञान व पीक पध्दती विकसित करणे.

क. कमी अधिक कालावधीचे हवामान बदलांमुळे निर्माण होणाऱ्या जैविक आणि अजैविक ताणास प्रतिकारक्षम, तसेच अधिक उत्पादन देणारे वाण विकसीत करणे.

ड. क़षि यांत्रिकीकरण पीक पध्दती राबविणे.

इ. कोरडवाहू क्षेत्रास अनुकूल असणारे पीक पध्दती/ तंत्रज्ञान राबविणे.

ई. व्यवसायीक तसेच क़षिपूरक उद्योग प्रणाली राबविणे.

उ. संशोधन केंद्राच्या मर्यादा लक्षात घेता पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच त्याचे बळकटीकरण करून संशोधन केंद्र सक्षम बनविणे.

१. कृषि संशोधन केंद्र, चास येथे मोठया प्रमाणात कांदा बियाणे उत्पादन व विक्रीच्या माध्यमातून संशोधन केंद्र आर्थिक स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीने अधिकचे प्रयत्न.

**१०. संशोधन योजना /केंद्राच्या सुधारणेसाठी/ बळकटीकरणासाठी आवश्यक असलेले उपाय -**

१. कृषि संशोधन केंद्र, चास येथे मोठया प्रमाणात कांदा बियाणे उत्पादन व विक्रीच्या माध्यमातून संशोधन केंद्र आर्थिक स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीने अधिकचे प्रयत्न.

२. संशोधन केंद्राच्या मर्यादा लक्षात घेता पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच त्याचे बळकटीकरण करून संशोधन केंद्र सक्षम बनविणे. यामध्ये

१. उंदीर प्रतिबंध गोदाम / साठवणूक गृह २. कृषि विक्री केंद्र ३. वाहन व यंत्र सामुग्री यासाठी बंदिस्त शेड

४.पुरुष व महिला प्रसाधन गृह ५. नूतन कार्यालयीन इमारत बांधकाम ६. कार्यालय इमारत व रस्ते विद्युत दुरुस्ती इ.

७. क़षि यांत्रिकीकरण पीक पध्दती राबविणे.

८. कोरडवाहू क्षेत्रास अनुकूल असणारे पीक पध्दती/ तंत्रज्ञान राबविणे.

९. व्यावसायीक तसेच क़षिपूरक उद्योग प्रणाली राबविणे.

**११. संशोधन केंद्राचा शेतकऱ्यांना काय फायदा होईल** -

सदरचे संशोधन केंद्र हे अहिल्यानगर शहरापासून १३ कि. मी. अंतरावर अहिल्यानगर- पुणे या राज्यमार्गावर आहे.. या संशोधन केंद्राची स्थापना झालेपासून आजतगायत या केंद्रामार्फत कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाच्या विविध शिफारशीमध्ये प्रामुख्याने आंतरपीक पध्दत, पीकफेरपालट, मृद व जलसंधारण, खते व्यवस्थापन तसेच विविध पीक वाणांच्या निर्मितीमध्ये सहभाग आहे. कृषि संशोधन केंद्र, चास ता.जि. अहिल्यानगर या केंद्राची स्थापना ८ जुलै १९४१ मध्ये झाली असून हे केंद्र मुख्य कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, सोलापूर या केंद्राचे उपकेंद्र म्हणून कार्यान्वित आहे. या संशोधन केंद्राचे सरासरी कमाल तापमान ३७.६ं से. व किमान तापमान १५.३ं से. इतके असून सरासरी पर्जन्यमान ५८४.५ मी.मी. इतके आहे. या केंद्रावर सोयाबीन, कांदा, बाजरी, सूर्यफूल, तूर, ज्वारी, करडई, ॲस्टर, हरभरा इ. विविध पीकाचा बिजोत्पादन कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविण्यात येत असून विविध बि-बियाणांची शासकिय माफक दरात शेतकऱ्यांना कृषि विक्री केंद्रामार्फत विक्रीही केली जाते. यास्तव विविध खरीप व रब्बी पीकांच्या संशोधनात्मक बहूक्षेत्रीय चाचण्या घेण्यात येतात. या संशोधन केंद्रास आजआखेर ८४ वर्षे पूर्ण झाली असून या केंद्राचा मुख्य उददेश कोरडवाहू शेतीचे तंत्रज्ञान विकसीत करणे, तसेच कोरडवाहू शेतीविषयक विस्तार कार्यक्रम राबविणे. यामध्ये पीक प्रात्यक्षिक शेतकरी मेळावे इ. क़षि विषयक सुधारीत तंत्रज्ञानाचा प्रसार करणे असा आहे. खरीप व रब्बी पिक बिजोत्पादन व विक्री यामुळे भविष्यात विविध खरीप व रब्बी पीकांच्या संशोधन पध्दतीचा, अद्ययावत तंत्रज्ञानाचा व उपलब्ध होणाऱ्या नवनवीन वाणांचा शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होऊन त्यांचा आर्थिक स्तर व जीवनमान उंचावण्यास मदत होईल.